सत्यमेव जयते

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८,क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११००१**
**Website: trti.maharashtra.gov.in**
**दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४**

**जा.क्र./आसंप्रसं/२०२६/स्प.प./साचाप२६/का.०४/ ३८१३** **दि.२६/०८/२०२६**

## प्रसिद्धीपत्रक

सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने सन २०२६ - २७ करीता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांच्या लाभार्थी निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या सामायिक चाळणी परीक्षा - २०२६ करीता ऑनलाईन अर्ज मागविण्याची प्रक्रिया दि.०९ ऑगस्ट, २०२६ पासून सुरु करण्यात आली आहे.

**२.** सदरच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या संस्थांच्या लक्षित गटातील पात्र व इच्छुक उमेदवारांना सूचित करण्यात येते की, संबधित संस्थांच्या विविध योजनांच्या लाभार्थी निवडी करीता घेण्यात येणाऱ्या सामायिक चाळणी परीक्षा - २०२६ साठी निर्धारित करण्यात आलेली **कमाल ३० वर्षे वयोमर्यादा शिथिल करण्यात आलेली आहे**. त्यामुळे उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजना व संस्थेनुसार लागू असलेली सुधारित किमान वयोमर्यादा निकष संबंधित संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनेनुसार काळजीपूर्वक तपासून ऑनलाईन अर्ज सादर करावा.

**३.** तरी सदर ऑनलाईन अर्ज प्रक्रियेस **दि.०४ सप्टेंबर, २०२६, रात्री ११.५९ वाजेपर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे. तद्नंतर त्यास कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(निलेश सागर, भा.प्र.से.)
**अध्यक्ष, स्प. प. प्र. अं व स. समिती तथा**
**आयुक्त, आसंप्रसं, पुणे**